सुविचार

जर तुमचे निर्धार पक्के असेल आणि सोबत परिपूर्णता असेल तर यश तुमचा मागे येईल.

दैनिक **आरंभ मराठी**

www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 44 ■ मंगळवार, 5 मे 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com







# धाराशिवमध्ये पहिल्या टप्प्यात ८०० भटक्या कुत्र्यांची नसबंदी, दररोज २५ शस्त्रक्रिया होणार

## शहरातील भटक्या कुत्र्यांवर नियंत्रणासाठी पालिकेच्या मोहिमेला प्रारंभ





**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव शहरातील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी नगरपरिषदेने अखेर ठोस पाऊल उचलले असून आजपासून (दि.५) कुत्र्यांच्या बंदोबस्ताची विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. नगराध्यक्षा नेहा राहुल काकडे यांच्या पुढाकाराने ही मोहीम राबविण्यात येत आहे. मागील कित्येक वर्षांपासून शहरातील नागरिकांना भटक्या कुत्र्यांचा त्रास होत होता. विशेषतः ख्वाजा नगर आणि डीपी रोडवरील नागरिकांना याचा मोठा त्रास होत होता. अखेर नगरपालिकेने मोहीम हाती घेतल्याने नागरिकांना दिलासा मिळणार आहे.




धाराशिव शहरात भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी नगरपरिषदेकडे वारंवार प्राप्त होत होत्या. याची दखल घेत नगरपालिकेच्या पहिल्याच सभेत या प्रश्नावर उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले होते. त्यानुसार आवश्यक निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. राज्यातील न्यायालयीन अटींची पूर्तता करणाऱ्या संस्थांची संख्या मर्यादित असल्यामुळे तीन वेळा निविदा काढण्यात आल्या होत्या. अखेरीस साताऱ्यातील 'जेनिस स्मित ॲनिमल वेलफेअर असोसिएशन' या संस्थेला कमी दरात काम देण्यात आले आहे.या मोहिमेअंतर्गत नगरपरिषदेने दोन स्वतंत्र शेड उभारले असून येथे दररोज सुमारे २५ कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करून त्यांची नसबंदी करण्यात येणार आहे. शस्त्रक्रियेनंतर ४ ते ५ दिवस कुत्र्यांची देखभाल केली जाईल आणि त्यानंतर त्यांना ज्या ठिकाणाहून पकडण्यात आले आहे, त्याच ठिकाणी पुन्हा सोडण्यात येईल.हिंस्त्र कुत्र्यांबाबत विशेष उपाययोजना करण्यात येणार असून अशा कुत्र्यांना नगरपरिषदेच्या देखरेखीखाली ठेवून त्यांचा आवश्यक त्या पद्धतीने बंदोबस्त केला जाणार आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात सुमारे ८०० कुत्र्यांची नसबंदी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या मोहिमेच्या प्रारंभिक कार्यक्रमाला नगराध्यक्षा नेहा काकडे, आरोग्य समिती सभापती अक्षय ढोबळे, नगरसेवक राहुल काकडे, मुख्याधिकारी निता अंधारे, उपमुख्याधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक अभिजीत गोरे आदी उपस्थित होते. या मोहिमेसाठी नगरपरिषदेचे चार कर्मचारी तसेच ठेकेदार संस्थेचे कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, एक विशेष वाहनही उपलब्ध करून देण्यात आले आहे. शहरातील मुख्य बाजारपेठा, चिकन व मटन दुकाने परिसर यांसारख्या ठिकाणी प्रथम कारवाई केली जाणार असून त्यानंतर इतर भागांतील कुत्र्यांवर नियंत्रण मिळवले जाईल. पुढील दोन ते तीन महिन्यांत शहरातील भटक्या कुत्र्यांची समस्या मोठ्या प्रमाणात नियंत्रणात येईल, असा विश्वास नगराध्यक्षा नेहा काकडे यांनी व्यक्त केला असून नागरिकांनी या काळात संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे.

# परंडा शहरातील गाव तळ्यात अज्ञात महिलेचा मृतदेह आढळल्याने खळबळ

**आरंभ मराठी । परंडा**

परंडा शहरातील गाव तळ्यात रविवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. पाण्यावर तरंगत असलेला मृतदेह नागरिकांच्या निदर्शनास आल्यानंतर ही घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच परंडा पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक आसाराम चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या पथकात पोलीस नाईक विश्वनाथ शिंदे, राहुल गायकवाड, नितीन गुंडाळे, भडांग आडसूळ, सूर्यजित जगदाळे व सागर सरगर यांचा समावेश होता. पोलीसांनी पंचनामा करून मृतदेह पाण्यातून बाहेर काढला असून संबंधित महिलेची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मृत्यूचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून याबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, अज्ञात महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास तातडीने परंडा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# धाराशिवमध्ये आज 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय' नाटकाचा प्रयोग

**आरंभ मराठी । धाराशिव**

विनोद, कौटुंबिक नातेसंबंध आणि हलक्याफुलक्या मनोरंजनाची मेजवानी ठरणारे 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय' हे गाजलेले मराठी नाटक आज (दि.५) धाराशिवमध्ये रंगणार आहे. या नाटकाचे आयोजन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले आहे. या नाटकाचा प्रयोग आज रात्री ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह, धाराशिव येथे होणार आहे. लहानांपासून थोरांपर्यंत प्रत्येक वयोगटातील प्रेक्षकांना मनमुराद आनंद देणारे हे नाटक असल्याने रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने विशाल शिंगाडे यांनी केले आहे.मराठी रंगभूमीची समृद्ध परंपरा जपणाऱ्या या नाटकातून विनोदासोबतच समाजातील वास्तवावर भाष्य करण्यात आले असून, प्रेक्षकांना हसवतानाच विचार करायलाही भाग पाडणारा हा प्रयोग ठरणार आहे. सशक्त अभिनय, नेटकं दिग्दर्शन आणि प्रभावी कथानक यामुळे हे नाटक रसिकांच्या पसंतीस उतरले आहे.धाराशिवसारख्या सांस्कृतिक जाण असलेल्या शहरात अशा दर्जेदार नाट्यप्रयोगाचे आयोजन होत असल्याने नाट्यप्रेमींनी कुटुंबासह उपस्थित राहून संधीचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# शॉर्टसर्किटमुळे पळसपमध्ये दोन एकर ऊस जळून खाक; ड्रीप पाईपलाईनचेही मोठे नुकसान

**आरंभ मराठी । पळसप**

पळसप येथील शेतकरी राजेंद्र रघुनाथ कुंभार यांच्या शेतात शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागून दोन एकरांवरील ऊस पीक तसेच ड्रीप सिंचनाची संपूर्ण पाईपलाईन जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. या आगीत शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून मेहनतीने उभे केलेले पीक काही क्षणात नष्ट झाले. मिळालेल्या माहितीनुसार, गट क्रमांक 195 मधील शेतात विद्युत पुरवठ्यासाठी गेलेल्या तारेला इतर तार चिकटल्याने शॉर्टसर्किट झाले.



यावेळी पडलेल्या ठिणगीमुळे उसाच्या शेतात आग लागली. उन्हाळ्यामुळे आधीच कोरडे व अतिउष्ण वातावरण असल्याने आग वेगाने पसरत गेली. पाहता पाहता संपूर्ण दोन एकर ऊस जळून खाक झाला.या आगीत शेतात बसविण्यात आलेली ड्रीप सिंचनाची पाईपलाईनही वितळून पूर्णपणे नुकसानग्रस्त झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे दुहेरी नुकसान झाले असून आर्थिक फटका मोठा बसला आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीची तीव्रता आणि उष्णता अधिक असल्याने आग आटोक्यात आणणे कठीण ठरले. दरम्यान, पाण्याची टंचाई असतानाही इतर पिकांकडे दुर्लक्ष करून संबंधित शेतकऱ्याने ऊस पिकासाठी रात्रंदिवस मेहनत घेतली होती. मात्र एका क्षणात सर्व कष्टांवर पाणी फिरल्याने शेतकरी हतबल झाला आहे. या घटनेचा पंचनामा करून तात्काळ आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकरी राजेंद्र कुंभार यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# धाराशिव शहरात घरफोडीचा प्रकार

**धाराशिव** :- आनंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीचा प्रकार उघडकीस आला असून अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून सुमारे 1 लाख 93 हजार 760 रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी बाळासाहेब गंगाधार पाटील (वय 63, रा. विकास नगर, रायगड फंक्शन हॉलच्या पाठीमागे, धाराशिव) हे व योगेश फुलसे कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. दरम्यान, दिनांक 24 एप्रिल 2026 रोजी रात्री अज्ञात चोरट्याने त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. चोरट्याने घरातील 69 ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच 50 ग्रॅम चांदीचे दागिने असा एकूण 1,93,760 रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी बाळासाहेब पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 331(4) व 305(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अतिक्रमण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर तुळजापूर व्यापाऱ्यांची तीन फूट फुटपाथची मागणी

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्याने व्यापाऱ्यांनी नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्याकडे तीन फूट फुटपाथ उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तुळजापूर शहरात सध्या अतिक्रमण मोहीम सुरू असून मंदिर परिसर मोठ्या प्रमाणात मोकळा झाला आहे. या मोहिमेला व्यापाऱ्यांनी समर्थन दिले असले तरी दुकाने पाठीमागे घ्यावी लागल्यामुळे त्यांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. सध्या उन्हाळी सुट्ट्यांमुळे भाविकांची संख्या वाढलेली असून हा कालावधी व्यापारासाठी महत्त्वाचा असल्याचेही व्यापाऱ्यांनी सांगितले. व्यापारी मंडळाने नगराध्यक्षांना दिलेल्या निवेदनात प्रत्येक दुकानासमोर किमान तीन फूट जागा फुटपाथ म्हणून देण्यात यावी, तसेच त्या मर्यादेपेक्षा जास्त अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर अमित झरकर, दादा कदम, अभिजीत निकम, कैलास मस्के, लक्ष्मीकांत सरवदे, शैलेश जैस्वाल, रोहन पुजारी, प्रवीण पाटील यांच्यासह अनेक व्यापाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान, निवेदन देण्यासाठी गेलेल्या व्यापाऱ्यांना नगराध्यक्ष बाहेरगावी असल्याने प्रत्यक्ष भेट झाली नाही. मात्र, दूरध्वनीवरून चर्चा करताना नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी सांगितले की, येत्या दोन-तीन दिवसांत आमदार राणाजगजीतसिंह पाटील तुळजापूरला येणार असून त्यांच्या उपस्थितीत व्यापाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकीत नगरपरिषद प्रशासनही सहभागी होणार असून व्यापाऱ्यांच्या अडचणींवर तोडगा काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

**आरंभ मराठी** सोयाबीन बियाण्यांच्या किंमती वाढण्याची शक्यता

# सोयाबीनला 'सुवर्ण' झळाळी; दर साडेसहा हजारांच्या उंबरठ्यावर

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यासह राज्यभरातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक घडामोड घडत असून, हंगामाच्या अंतिम टप्प्यात सोयाबीनच्या दरात पुन्हा एकदा लक्षणीय उसळी पाहायला मिळत आहे. वर्षभर सातत्याने चढ-उतार अनुभवलेल्या या पिकाच्या दरांनी आता साडेसहा हजारांच्या उंबरठ्याजवळ पोहोचत शेतकऱ्यांना काहीसा आधार दिला आहे. गेल्या काही महिन्यांत सोयाबीनच्या दरात मोठी अनिश्चितता होती. एकीकडे कधी दरात वाढ होत होती, तर दुसरीकडे अचानक घसरण होत असल्याने शेतकऱ्यांची अवस्था दोलायमान झाली होती. काही काळात तर सोयाबीनचे दर ४ हजार रुपयांपर्यंत घसरल्याने उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागला होता. उत्पादन खर्च वाढत असताना मिळणारा दर अत्यल्प असल्याने अनेक शेतकरी अडचणीत सापडले होते. मात्र, सध्याच्या घडीला बाजारातील परिस्थितीत सकारात्मक बदल दिसून येत आहे. सोमवारी सोयाबीनचे दर सुमारे ६४०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत पोहोचले असून, २०२२ नंतर प्रथमच एवढ्या उच्च पातळीवर दर गेले आहेत. बाजारात सोयाबीनची आवक कमी होत चालल्याने दरवाढीस चालना मिळत असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगितले जात आहे. दरवाढीमागे केवळ स्थानिक घटकच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी देखील कारणीभूत आहेत. जागतिक पातळीवर तेलबियांच्या मागणीत झालेली वाढ, उत्पादनातील चढ-उतार तसेच देशांतर्गत साठ्याची मर्यादित उपलब्धता या सर्व घटकांचा परिणाम सोयाबीनच्या दरावर होत आहे. त्यामुळे सध्याची दरवाढ टिकून राहील का, की पुन्हा घसरण होईल, याबाबत अनिश्चितता कायम आहे. येत्या काही दिवसांत दरात चढ-उतार सुरूच राहण्याची शक्यता आहे. हंगामाच्या सुरुवातीला सोयाबीनचे दर ४४०० ते ४६०० रुपयांच्या दरम्यान होते. केंद्र सरकारने सोयाबीनसाठी ५३२८ रुपये प्रति क्विंटल असा हमीभाव जाहीर केला होता. मात्र प्रत्यक्षात बहुतांश शेतकऱ्यांना हमीभावाएवढाही दर मिळू शकला नाही. अनेक ठिकाणी खरेदी केंद्रे वेळेवर सुरू न होणे, मर्यादित खरेदी क्षमता आणि तांत्रिक अडचणी यामुळे शेतकऱ्यांना त्याचा अपेक्षित लाभ घेता आला नाही. परिणामी, अनेक शेतकऱ्यांनी आर्थिक गरजेमुळे आपले उत्पादन खुल्या बाजारात कमी दराने विकावे लागले. काही ठिकाणी तर दर ४ हजार रुपयांखाली गेल्याने शेतकऱ्यांचा तोटा अधिकच वाढला.



## बियाण्यांच्या किंमती वाढण्याची शक्यता

एकीकडे सोयाबीनचे दर वाढत असताना दुसरीकडे आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर नवीन चिंता समोर येत आहे. सध्या शेतकरी पेरणीपूर्व मशागतीच्या कामात व्यस्त असून लवकरच खरीप हंगामाची सुरुवात होणार आहे. धाराशिव जिल्ह्यात सोयाबीन हे प्रमुख नगदी पीक असल्याने मोठ्या प्रमाणावर त्याची लागवड केली जाते. यावर्षीही सुमारे साडेचार लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, बाजारात सोयाबीनच्या दरात झालेल्या वाढीचा परिणाम आता बियाण्यांच्या किमतीवरही होण्याची शक्यता आहे. सध्या २८०० ते ३००० रुपयांच्या दराने उपलब्ध असलेली बियाण्याची एक बॅग येत्या काही दिवसांत ३५०० रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे उत्पादन खर्चात आणखी वाढ होण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त केली जात आहे.

# अनुसूचित जाती उप वर्गीकरण संदर्भात आज बैठक

## सर्व मागासवर्गीय बांधवांनी उपस्थित राहण्याचे धनंजय शिंगाडे यांचे आवाहन

**आरंभ मराठी । धाराशिव**




राज्य सरकारच्या माध्यमातून अनुसूचित जातीतील ५९ जातींच्या समुहामध्ये उभी फूट पाडण्याचा कुटील डाव सुरु आहे. त्यासाठी न्यायमूर्ती अनंत बदर समिती नेमून त्या समितीने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे अनुसूचित जातीचे अ, बं, क, ड असे उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया अवलंबवली जात आहे. ही कृती संविधानिक नसून घटना आणि नियमबाह्य आहे. ते होऊ नये म्हणून उपवर्गीकरणास संपूर्ण महाराष्ट्रात प्रचंड कडाडून विरोध होत आहे. त्यामुळे या संदर्भात धोरण ठरविण्यासाठी मंगळवारी (दि.५) बैठक आयोजित करण्यात आली असून या बैठकीस अनुसूचित जातीमधील सर्वच जाती समूहांनी उपस्थित रहावे, असे आवाहन बहुजन योध्दा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय शिंगाडे यांनी केले आहे. भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जाती प्रवर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष कायद्याद्वारे तरतूद केलेली आहे. त्यामुळे हजारो वर्षापासून वंचित असलेल्या व विकासापासून दूर फेकलेल्या जातीतील नागरिकांना विकासाच्या प्रवाहात आणण्याची तरतूद घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी करून ठेवलेली आहे. त्यामुळे मागास जातींचा विकास होत आहे. त्यामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करता येत नाही. जर बदल करायचाच असेल तर तो अधिकार केंद्र सरकारला आहे. त्यासाठी देखील समिती गठीत करून त्या जाती समूहातील नागरिकांचे काय म्हणणे आहे ? हे विचारात घेणे आवश्यक असते. जर त्या नागरिकांनी सुधारणा करण्यास लेखी परवानगी दिली किंवा होकार दर्शविला तर ते करता येते. मात्र, केंद्र सरकार मागास समाजाला पुन्हा विकासाच्या प्रवाहापासून कोसो दूर लोटण्यासाठीच उप वर्गीकरण करण्याचा घाट घालीत आहेत. हे संविधानिक आणि नैसर्गिक न्यायाला धरून नसून तो सरळ सरळ मागास समाजावर अन्याय करणारे कृत्य आहे. त्यामुळे जातीयवादी सरकारच्या अन्यायकारक षडयंत्र बाबत धोरण निश्चित करण्यासाठी धाराशिव शहरातील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरील शासकीय विश्रामगृह येथे ५९ जाती समूहांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस जिल्हाभरातील सर्व बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन बहुजन योध्दा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय शिंगाडे यांनी केले आहे.

# विवेकस्वातंत्र्याचा उद्घोष करणारे 'बुद्धांचे कालामसुत्त'

-भरत यादव
yadavbh515@gmail.com
9890140500



'बुद्धांचे कालामसुत्त' हे ज्येष्ठ विचारवंत आणि प्राच्यविद्यापंडीत डॉ. आ. ह. साळुंखे लिखित पासष्टावे पुस्तक आहे.विवेकस्वातंत्र्याचा उद्घोष करणारे बुद्धांचे कालामसुत्त हे पुस्तक बुद्धांच्या शिकवणीतील एका अत्यंत प्रभावशाली सुत्तावर आधारीत आहे. हे पुस्तक 'सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुद्ध' या त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथातील कालामसुत्त विभागाचा विस्तारित आणि स्वतंत्र स्वरूपातला आविष्कार मानता येईल. कालामसुत्त हे अंगुत्तर निकायातील ३.६५ वे सुत्त आहे. केसमुत्ती गावातील कालाम जातीच्या लोकांनी बुद्धांना भेटून आपला वैचारिक गोंधळ व्यक्त केला. अनेक श्रमण-ब्राह्मण येतात, प्रत्येकजण आपले मत सर्वोच्च ठरवतो आणि दुसऱ्याचे खोडून काढतो. आम्हाला कसे ओळखावे की कोण खरे? बुद्धांनी दिलेला उत्तर आजही जगभरातील विचारवंतांना प्रेरणा देतो. ते म्हणतात – 'कालामा, केवळ ऐकल्यावरून, परंपरेने, लोकप्रियतेने, ग्रंथप्रामाण्याने, तर्काने, अनुमानाने, गुरूच्या प्रतिष्ठेमुळे किंवा 'तो आमचा गुरू आहे' म्हणून कोणत्याही गोष्टीला स्वीकारू नका."बुद्ध




येथे दहा प्रकारच्या 'अंधश्रद्धा'ना स्पष्ट नकार देतात. त्यानंतर ते एक साधी, पण क्रांतिकारी कसोटी सांगतात: स्वतःच्या बुद्धीने, अनुभवाने आणि निरीक्षणाने तपासा. जर एखादा विचार किंवा कृत्य 'अकुशल, दोषपूर्ण आणि दुःख घडवणारे' असेल तर त्याचा त्याग करा. आणि तो 'कुशल, दोषरहित आणि सुख-कल्याण घडवणारा' असेल तर त्याला स्वीकारा व त्यानुसार जगणे सुरू करा. ही कसोटी केवळ बौद्ध धम्मासाठीच नव्हे, तर मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्रासाठी आणि व्यक्तीसाठी लागू आहे.डॉ. साळुंखे यांनी या सुत्ताचा मराठी अनुवाद दिला आहे. त्यानंतर त्याचे सविस्तर विवेचन केले आहे. ते हे सुत्त केवळ धार्मिक संदर्भात मर्यादित ठेवत नाहीत. ते त्याला आजच्या काळाशी जोडतात – सोशल मीडियावरील फेक न्यूज, धार्मिक अंधश्रद्धा, राजकीय प्रचार, गुरू-शिष्य परंपरा आणि 'ट्रेंडिंग' गोष्टींवर अंधश्रद्धेने विश्वास ठेवण्याच्या प्रवृत्तीविरुद्ध हे सुत्त एक शक्तिशाली आव्हान आहे, असे ते दाखवतात.पुस्तकाचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे जगभरातील विद्वानांच्या मतांचा समावेश. लेखक ५० हून अधिक भिक्खू, संशोधक आणि तत्त्वज्ञांची कालामसुत्ताविषयक मते उद्धृत करतात. भारतापासून श्रीलंका, थायलंड, चीन, अमेरिका, युरोपपर्यंतच्या अभ्यासकांनी या सुत्ताचे जे विविध अर्थ लावले आहेत, त्यांचे संकलन आणि विवेचन इथे आहे. यामुळे वाचकांना समजते की कालामसुत्त हा केवळ २५०० वर्षांपूर्वीचा उपदेश नाही, तर तो आजही जिवंत आणि प्रासंगिक आहे.डॉ.आ.हं यांची लेखनशैली ऋजू, तर्काधिष्ठित आणि मानवी आहे. ते बुद्धांना "भूमिपुत्र" म्हणून गौरवतात, संबोधतात. बुद्ध राजघराण्यात जन्मले असले तरी त्यांनी सामान्य माणसाच्या दुःखाशी, सामाजिक अन्यायाशी आणि वैचारिक गुलामगिरीशी स्वतःला जोडले. कालामसुत्तात बुद्ध अंधश्रद्धा, कर्मकांड, दैवी हस्तक्षेप आणि मरणोत्तर जीवनाच्या अंधविश्वासांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवतात. लेखक यावरून बुद्धांच्या धम्माला मानवतावादी, धर्मनिरपेक्ष आणि वैज्ञानिक स्वरूप देतात. हे विश्लेषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बुद्ध-विचारांशी सुसंगत वाटते. पुस्तकात पाली शब्दांचे अर्थ, स्पष्टीकरण, विविध सूची आणि परिशिष्टे दिली आहेत. परिशिष्टात मूळ पाली संहिता आणि इंग्रजी भाषेतील मांडणीही आहे. यामुळे हे पुस्तक सामान्य वाचकांसोबतच गंभीर अभ्यासकांसाठीही उपयुक्त ठरते.आजच्या काळात जेव्हा लोक 'व्हायरल' किंवा 'ट्रेंडिंग' गोष्टींवर बिनतोड विश्वास ठेवतात, तेव्हा बुद्धांचा "मा अनुस्सवेन..' (फक्त ऐकल्यावरून मानू नका) हा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे. डॉ. साळुंखे यांनी या सुत्ताला नव्या पिढीपर्यंत सोप्या भाषेत नेले आहे. ते दाखवतात की बुद्धत्व हे अलौकिक देवत्व नव्हे, तर प्रत्येक माणसातील विवेक, करुणा आणि स्वतंत्र चिंतन यांचा विकास आहे. कालामसुत्त हा या विकासाचा पहिला आणि मूलभूत पाया आहे. हे पुस्तक वाचताना वाचकाच्या मनात एक सतत प्रश्न उभा राहतो – 'मी जे मानतो ते खरोखर स्वतः तपासून मानले आहे का?' ही विचारप्रक्रिया सुरू करणे हे या पुस्तकाचे सर्वांत मोठे यश आहे. आ.ह. सर बुद्धांच्या शिकवणुकीला केवळ ऐतिहासिक किंवा धार्मिक चौकटीत बंदिस्त करत नाहीत, तर ती आजच्या सामाजिक, राजकीय आणि वैयक्तिक जीवनाशी जोडतात.'विवेकस्वातंत्र्याचा उद्घोष करणारे बुद्धांचे कालामसुत्त' या पुस्तकातील आशय गहन आणि परिवर्तनकारी आहे. आ.ह.सरांच्या विद्वत्तेचा, तर्कशुद्धतेचा आणि मानवी संवेदनशीलतेचा सुंदर संगम यात दिसतो. ज्यांना बुद्ध केवळ पूजनीय व्यक्ती नव्हे, तर एक महान विचारवंत, समाजसुधारक आणि विवेकाचे प्रणेते म्हणून जाणून घ्यायचे आहे, त्यांच्यासाठी हे पुस्तक खरोखरच अमूल्य आहे. बुद्धांच्या शब्दांत सांगायचे झाले तर हे पुस्तक वाचून 'स्वतः जाणून घ्या' (अत्तनाव जानेय्याथ) आणि त्यानुसार जगण्याचा प्रयत्न करा.' आ.ह.सरांनी 'बुद्धांचे कालामसुत्त' नव्याने वाचकांसमोर आणून बुद्धीवादी विचारसरणीची महत्ता अधोरेखीत केली आहे.पुस्तकाचे नावः बुद्धांचे कालामसुत्तलेखक

.पुस्तकाचे नावः
बुद्धांचे कालामसुत्त
लेखक : डॉ.आ.ह.साळुंखे
प्रकाशकः लोकायत प्रकाशन,सातारा
पृष्ठसंख्या -१२८
किंमतः २५० रुपये

# वेळीच सावध व्हा!

रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार,
नागपूर.






दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे वातावरणात आमुलाग्र बदल होतांना दिसतो. यामुळे अती उष्णतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून पाण्याचा दुष्काळ पडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. सध्याच्या परिस्थितीत राज्यासह देशातील अनेक भागात ४० ते ४६ अंश सेल्सिअस पर्यंत तापमान पोहोचले आहे, म्हणजे सर्वत्र तापमानाने ४० अंश सेल्सिअस तापमान पार केल्याचे स्पष्ट दिसून येते. काही भागात वादळी वाऱ्यासह बेमोसमी पाऊस पडत आहे. यामुळे संपूर्ण वातावरणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. राज्यासह देशातील ज्या शहराचे तापमान जास्तीत जास्त फक्त ४० अंश सेल्सिअस पर्यंत रहात होते त्या संपूर्ण शहरांनी तापमानाचा उच्चांक गाठून ४५ अंश सेल्सिअस पर्यंत तापमान पार केल्याचे दिसून येते. हा तापमान वाढीचा प्रकार अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस वाढत्या तापमानामुळे मोठी बिकट आणि गंभीर परिस्थिती निर्माण होत आहे. आज देशातील औद्योगिक, शहरीकरण, सिमेंट रोड, गाड्यांचा धुर, एसी, लोकांच्या वाढत्या सुखसुविधा यामुळे तापमानात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत असून याचा परिणाम आपणा सर्वांना भोगावा लागत आहे. अती उष्णतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून याचा परिणाम शेतीवर मोठ्या प्रमाणात पडत असुन यंदा दुष्काळाचे सावट शेतकऱ्यांच्या डोक्यावर मंडरावतांना दिसत आहे. सोबतच राज्यात 'एल निनो'मुळे भीषण पाणी टंचाईचे संकट ओढवण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. कारण प्रशांत महासागरामध्ये 'एल निनो'ची स्थिती सक्रिय होत असल्याने मान्सूनच्या पावसावर त्याचा नकारात्मक परिणाम होण्याची भीती वर्तवली जात आहे. यामुळे मान्सूनच्या उत्तरार्धात म्हणजे जुलै ते सप्टेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण अधिक कमी राहू शकते. 'एल निनो'मुळे महाराष्ट्रातील बहुतांश भागात विशेषत: मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात, नेहमीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. किनारी कोकण विभाग तसेच विदर्भातील काही भागात तुलनेने पावसाचे वितरण चांगले राहू शकते. परंतु सरासरीपेक्षा कमी पावसाचा धोका असल्याने खरीप हंगामातील पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. यंदाची भीषण उष्णता ही वाढते औद्योगिकीकरण, कार्बन उत्सर्जन आणि बेसुमार जंगलतोडीचा परिणाम आहे. ही समस्या तात्पुरती नसून भविष्यात महाभयानक संकटाची नांदी आहे. यावर वेळीच लगाम कसली नाही तर भयावह संकट निर्माण होऊ शकते. कारण सध्याच्या परिस्थितीत विदर्भातील मुख्य शहराचे तापमानाच्या बाबतीत विचार केला तर अकोला -४५, वर्धा -४५, नागपूर -४४.४, अमरावती -४४, गोंदिया -४४.५, यवतमाळ -४३.२, ब्रम्हपुरी -४३.२, गडचिरोली -४३.२ अंश सेल्सिअस पर्यंत पोहचले आहेत. यामुळे विदर्भ जणुकाही आगीची भट्टी बनली की काय असे वाटत आहे. कारण आजच्या परिस्थितीत विदर्भ हे जगातील हॉट शहरांमध्ये गणल्या गेले आहे ही चिंताजनक बाब आहे. देशात बदलत्या हवामानामुळे काही भागात आगडोंब उसळला आहे, तर काही भागात गारपीट किंवा वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे. हा सर्व प्रकार आणि येणारे 'एल निनो' संकट मानवाच्या अतिरेकामुळे निर्माण झालेली गंभीर आणि धोकादायक परिस्थिती आहे. असेसांगितलेजातेकी१४०वर्षांनंतरहा'एलनिनो' येत आहे ही महाभयंकर संकटांची नांदी आहे. पॅसिफीक महासागरात जेव्हा तापमान वाढते तेव्हा जगाचे हवामान चक्र बिघडते असे सांगितले जाते, यालाच 'एल निनो' म्हणतात. परंतु ही अत्यंत धोक्याची घंटा आहे. कारण 'एल निनो'मुळे महासागराचे तापमान २ अंश सेल्सिअसने वाढल्याचे सांगितले जाते. महासागराचे तापमान वाढणे म्हणजे संपूर्ण सृष्टीला धोक्याचे संकेत आहे. कारण बदलत्या हवामानामुळे देशासह संपूर्ण जगात गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून दिवसेंदिवस समुद्राचे पाणी वाढत आहे व जमीनीच्या पोटातील पाणी कमी-कमी होत आहे. हा सर्व प्रकार जंगलतोडीमुळे निर्माण झाला आहे. कारण शहरीकरण व आधुनिकीकरणामुळे जेवढेही पावसाचे पाणी पडते त्याच्या ८० टक्के पाणी समुद्राला जाऊन मिळते. कारण वाढत्या औद्योगिकरण व शहरीकरणामुळे जमीनीत पाणी जाण्याचे मार्ग ८० टक्के मार्ग बंद झाले आहे. त्यामुळे पाणी जमिनीच्या मुळाशी जातच नाही. याचा परिणाम म्हणजे तापमानात वाढ व भीषण पाणी टंचाई दिसून येते. राज्यांच्या विविध धरणांमध्ये सुमारे ६५३.६३ टीएमसी पाणीसाठा शिल्लक असल्याचे सांगितले जाते आणि आता 'एल निनो'च्या प्रभावामुळे यंदा पाऊस कमी होण्याची चिन्हे आहेत. यावर सरकारने उपाययोजना करण्याची सुरुवात केली आहे. परंतु या संपूर्ण परिस्थितीला सर्वात जास्त औद्योगिकरण, शहरीकरण व जंगलतोड जबाबदार आहे. जोपर्यंत राज्यासह देशात विकासाच्या नावाखाली होणारी जंगलतोड थांबणार नाही आणि मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होणार नाही तोपर्यंत आपण या भयावह घटनांवर मात करू शकणार नाही. त्यामुळे राज्यासह देशातील वाढते तापमान पहाता व वेळोवेळी बदलते हवामान पहाता वृक्षलागवड युद्धपातळीवर होणे आवश्यक आहे.

# सीबीएसईचा वाढता प्रभाव

भारताच्या शैक्षणिक क्षेत्राला नव्याने आकार देणाऱ्या एका महत्त्वपूर्ण प्रवाहात, अधिकाधिक पालक आपल्या मुलांसाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सी.बी.एस.ई.) अभ्यासक्रमाची निवड करत आहेत. हा बदल २१ व्या शतकातील आव्हानांसाठी विद्यार्थ्यांना तयार करण्यामध्ये सी.बी.एस.ई. प्रणालीद्वारे मिळणाऱ्या फायद्यांना मिळत असलेल्या वाढत्या मान्यतेचे द्योतक आहे. आपल्या संरचित दृष्टिकोनासाठी आणि सर्वसमावेशक अभ्यासक्रमासाठी ओळखला जाणारा सी.बी.एस.ई. अभ्यासक्रम, शैक्षणिक कठोरता आणि व्यावहारिक कौशल्ये यांचा मेळ घालणाऱ्या संतुलित शिक्षणाच्या शोधात असलेल्या पालकांमध्ये लोकप्रिय झाला आहे. जागतिक अर्थव्यवस्था विकसित होत असताना आणि तांत्रिक प्रगतीमुळे नोकरीच्या बाजारपेठांचे स्वरूप बदलत असताना, पालक आपल्या मुलांना एक असा भक्कम पाया देण्यास उत्सुक आहेत, जो चिकित्सक विचार, सर्जनशीलता आणि अनुकूलनक्षमतेला प्रोत्साहन देईल.

## सी.बी.एस.ई. शाळांची वाढती लोकप्रियता –

अलीकडील आकडेवारीनुसार, शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागांतील सी.बी.एस.ई.-संलग्न शाळांमधील प्रवेशांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. शिक्षण मंत्रालयाच्या मते, गेल्या दशकात सी.बी.एस.ई. शाळांची संख्या २०% पेक्षा जास्त वाढली आहे. अनेक पालक यामागे अभ्यासक्रमाचे राष्ट्रीय शैक्षणिक मानकांशी असलेले संरेखन आणि सर्वांगीण विकासावर असलेला भर ही कारणे देतात. सीबीएसई सर्वांगीण शिक्षण देते, जे विद्यार्थ्यांना आयआयटी-जेईई आणि नीट यांसारख्या विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयार करते, असे दिल्लीतील एक पालक, रमेश कुमार म्हणतात.

## लवचिकता आणि सुलभता

या प्रवृत्तीमागील एक प्रमुख घटक म्हणजे सीबीएसई अभ्यासक्रमाची लवचिकता आणि सुलभता. सर्व शाळांमध्ये एकसमान अभ्यासक्रम असल्यामुळे, पालक खात्री बाळगतात की त्यांच्या मुलांना त्यांच्या भौगोलिक स्थानाची पर्वा न करता, सातत्यपूर्ण दर्जाचे शिक्षण मिळेल. याव्यतिरिक्त, सीबीएसई अभ्यासक्रमानुसार तयार केलेली ऑनलाइन संसाधने आणि कोचिंग सेंटर्सच्या उपलब्धतेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासात उत्कृष्ट कामगिरी करणे सोपे झाले आहे. शिवाय, सीबीएसई शाळांमध्ये नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि डिजिटल शिक्षण साधनांच्या परिचयामुळे शिकण्याचा अनुभव अधिकच वाढला आहे. बोर्डाने अनुभवात्मक शिक्षण, प्रकल्प-आधारित मूल्यमापन आणि तंत्रज्ञानाच्या एकात्मतेवर दिलेला भर, आपल्या मुलांसाठी प्रगतिशील शिक्षणाला प्राधान्य देणाऱ्या आधुनिक पालकांना चांगलाच भावला आहे.



## आव्हाने आणि टीका –

वाढती लोकप्रियता असूनही, सीबीएसई अभ्यासक्रमात काही आव्हाने आहेतच. टीकाकारांच्या मते, पाठांतर आणि प्रमाणित चाचण्यांवर जास्त भर दिल्याने सर्जनशीलता आणि चिकित्सक विचारशक्ती खुंटू शकते. काही शिक्षणतज्ज्ञ अधिक संतुलित दृष्टिकोनाचे समर्थन करतात, ज्यात विविध शिक्षण पद्धतींचा समावेश असतो आणि स्वतंत्र विचारांना प्रोत्साहन दिले जाते. अशा चिंतांना प्रतिसाद म्हणून, सी.बी.एस.ई. ने परीक्षांचा भार कमी करण्याच्या आणि अधिक विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोनाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुधारणा सुरू केल्या आहेत. सातत्यपूर्ण सर्वसमावेशक मूल्यमापन (CCE) ही एक अशीच उपाययोजना आहे, जी केवळ महत्त्वाच्या परीक्षांवर अवलंबून न राहता, नियमित प्रतिसादाद्वारे विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

## भविष्यातील शक्यता–

जसजसे आपण २१ व्या शतकात पुढे जात आहोत, तसतशी दर्जेदार शिक्षणाची मागणी वाढतच आहे. जागतिकीकरण आणि तांत्रिक प्रगतीमुळे करिअरचे स्वरूप बदलत असल्याने, पालक अधिकाधिक अशा शैक्षणिक मार्गांची निवड करण्याकडे झुकत आहेत, जे अनुकूलता आणि प्रासंगिकता यांचे आश्वासन देतात. सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाकडे होत असलेला हा बदल एका व्यापक सामाजिक बदलाचे प्रतिबिंब आहे, जिथे शिक्षणाला मुलाच्या भविष्यातील एक महत्त्वपूर्ण गुंतवणूक म्हणून पाहिले जाते. जसजसे अधिकाधिक कुटुंबे हा ट्रेंड स्वीकारतील, तसतसे सतत बदलणाऱ्या जगात वावरण्यास सज्ज असलेल्या पिढीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शैक्षणिक संस्था कशा प्रकारे जुळवून घेतात आणि विकसित होतात, हे पाहणे मनोरंजक ठरेल. थोडक्यात, सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाला वाढती पसंती केवळ शैक्षणिक निवडीतील बदलच नव्हे, तर आधुनिक जीवनातील गुंतागुंतीला सामोरे जाण्यास तयार असलेल्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वांचे संगोपन करण्याची वचनबद्धता देखील दर्शवते. पालक दर्जेदार शिक्षणाला प्राधान्य देत असल्याने, देशभरातील सीबीएसई शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल दिसत आहे.

ॲड.विराज
उत्तमराव माकणीकर

# चिमुकलीचा बळी ; मानवतेला काळीमा फासणारी घटना

महाराष्ट्र दिनाचा सूर्य मावळण्याआधीच दोन अल्पवयीनांवर झालेल्या भीषण अत्याचार आणि खुनांच्या घटनांमुळे पुणे जिल्हा हादरला. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका ६५ वर्षीय नराधम व्यक्तीने आपल्या नातीच्या वयाच्या अवघ्या ४ वर्षीय चिमुरडीवर बलात्कार करून तिचा निर्घुण खून केला. चाकण जवळील महाळुंगे येथे एका १६ वर्षाच्या परप्रांतीयाने अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याचा खून केला. महाराष्ट्र दिनीच घडलेल्या या दोन भीषण घटनांनी केवळ पुणे जिल्हाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. नसरापूर आणि चाकण मधील घटना मानवतेला काळीमा फासणाऱ्याच आहे. या घटनांनी तळपायाची आग मस्तकात गेली असून संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. नसरापूर मधील नराधमाला फाशीची शिक्षा द्यावी यासाठी लोक रस्त्यावर उतरून आंदोलन करू लागली आहे. शनिवारी रात्री नसरापूर आणि परिसरातील संतप्त नागरिकांनी पुणे बंगळुरू महामार्गावरील नवले पुलावर ठिय्या आंदोलन केले. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर संतप्त नागरिकांनी आंदोलन मागे घेतले असले तरी नागरिकांचा रोष कमी झालेला नाही. नसरापूर मधील घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला असून मानवतेला काळिमा फासणाऱ्या या घटनेने राज्यात महिला तसेच मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अर्थात महाराष्ट्रात घडलेली ही पहिलीच घृणास्पद घटना नाही. मागील काही वर्षात तर अशा घटनांची मालिकाच सुरू आहे. दोन वर्षांपूर्वी बदलापूर येथील शाळेत ४ वर्षाच्या चिमुरडीवर शाळेतीलच एका कर्मचाऱ्याने बलात्कार करून खून केला या घटनेनंतरही संपूर्ण महाराष्ट्रात असा उद्रेक पाहायला मिळाला होता. त्याआधीही महाराष्ट्रात अशा अनेक घृणास्पद घटना घडल्या की ज्याने संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला. कोपर्डीची घटना तर अजूनही ताजीच आहे. अर्थात वर उल्लेख केलेल्या घटना या फक्त प्रातिनिधिक आहेत. अशा घटना आपल्या राज्यात दररोज घडत असतात. दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी घटना वाचायला मिळतेच. घटना घडून गेल्यावर शासनाकडून घटनेच्या चौकशीचे आणि पोलिसांकडून आरोपींना कठोर शिक्षा करण्याचे आश्वासन दिले जाते. अर्थात घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडून शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नयेत यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. नसरापूर प्रकरणात आरोपी असलेल्या नराधमाने याआधीही अशा घृणास्पद घटना केल्याची बाब समोर आली आहे. पॉक्सो कायद्याअंतर्गत त्याला तुरुंगाची वारी करावी लागलेली आहे. पॉक्सो कायद्या सारख्या गंभीर गुन्ह्यात अटक झालेल्या नराधमास अशा प्रकारे मोकळे सोडले तर तो पुन्हा असा प्रकार करू शकतो हे माहित असूनही त्याला तुरुंगाच्या बाहेर का सोडण्यात आले ? असा प्रश्न पडतो. पॉक्सो प्रकरणात तुरुंगाची वारी भोगूनही हा नराधम पुन्हा तेच कृत्य करतो आणि एका चिमुरडीचा जीव घेतो याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा धाक उरला नाही. कायद्याचा धाक नसल्यानेच हे नराधम असे माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य करण्यास मागे पुढे पाहत नाही. कायद्याचा धाक नसल्यानेच दिवसाढवळ्या महिलांची, मुलींची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशाप्रकारचे नराधमी कृत्य करण्याची हिंमत या नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही, पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला काळीमा फासणारे कृत्य करत आहेत. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना शोभनीय नाही. पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात आज कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलिस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार, उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होती. आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे. महाराष्ट्राचा बिहार, उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलिस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात. तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचारांच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कूलशेजारी, वाघोली,पुणे.

# उन्हाचा तडाखा वाढताच लिंबाची मागणी वाढली; दर गगनाला भिडले

## उत्पादन घट आल्याने आवक कमी; लिंबू १६० ते १९० रुपये किलो

अर्जुन गोडगे । आरंभ मराठी

**परंडा : सध्या वाढत्या उन्हाच्या झळांनी जनजीवन अक्षरशः हैराण झाले असून गेल्या पंधरा दिवसांपासून तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जात आहे. या कडक उन्हामुळे लिंबाच्या वापरात मोठी वाढ झाली असून बाजारात लिंबाची मागणी झपाट्याने वाढली आहे. मात्र, उत्पादन घटल्याने आणि आवक कमी झाल्याने लिंबाचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. परंडा तालुक्यातील ठोक बाजारात सध्या लिंबाला प्रतिकिलो १६० ते १९० रुपयांपर्यंत दर मिळत आहे. लिंबाचे दर गगनाला भिडल्याने सर्वसामान्यांसाठी लिंबू महाग झाले आहे.**



यंदाच्या उन्हाळ्यात लिंबाच्या उत्पादनात लक्षणीय घट झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. मागील काही वर्षांत लिंबाचे भरघोस उत्पादन होत असतानाही योग्य दर मिळत नव्हता. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी लिंबाच्या बागा तोडून इतर पिकांकडे वळण्याचा निर्णय घेतला. परिणामी यंदा उत्पादन घटले असून बाजारात लिंबाची आवक कमी झाली आहे. परंडा तालुक्यातील काही भागात पाण्याअभावी लिंबाच्या बागांचे उत्पादन घटले आहे. तर ज्या शेतकऱ्यांकडे शेततळे, कूपनलिका किंवा विंधन विहिरींची सुविधा आहे, त्यांनी मात्र लिंबाच्या बागा टिकवून उत्पादन घेतले आहे. सध्या किरकोळ बाजारात दोन लहान लिंबांसाठी १० ते १५ रुपये तर मध्यम आकाराच्या एका लिंबासाठी १० रुपये मोजावे लागत आहेत. उन्हाळ्यात लिंबाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याने त्याची मागणी अधिक वाढते. हॉटेल, हातगाड्या, लिंबू सरबत विक्रेते, रसवंतीगृहे तसेच ज्यूस सेंटरमध्ये लिंबाचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. याशिवाय लिंबामध्ये सायट्रिक ॲसिड आणि 'सी' जीवनसत्त्व मुबलक असल्याने आरोग्यदृष्ट्या त्याचे महत्त्व अधिक आहे. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी लिंबूपाणी उपयुक्त मानले जाते. ही परिस्थिती कायम राहिल्यास पुढील काही आठवड्यांत लिंबाचे दर आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वाढत्या उन्हामुळे लिंबू झाडालाच वाळत असून शेतकऱ्यांना उत्पादन घेणे देखील कठीण झाले आहे. त्यामुळे पुढील दोन महिने लिंबाचे भाव जास्तच राहण्याची शक्यता आहे.

### बऱ्याच वर्षांनी लिंबाला भाव मिळतोय

गेल्या दहा वर्षांपासून माझ्याकडे दीड एकरात लिंबाची बाग आहे. विंधन विहिरीमुळे पाण्याची सोय असल्याने उत्पादन टिकवता आले. यंदा उन्हाळा कडक असल्याने मागणी वाढली असून दरही समाधानकारक मिळत आहे. बऱ्याच वर्षांनी लिंबाला समाधानकारक भाव मिळत आहे.

**कांतिलाल मुळे**
शेतकरी, कांदलगाव.

# अणदूरमध्ये सेवानिवृत्त अंगणवाडी सेविकांचा गौरव



आरंभ मराठी । अणदूर

पौर्णिमा महिला बहुउद्देशीय संस्था, अणदूर यांच्या वतीने अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांच्या सेवानिवृत्ती निमित्त भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. दीर्घकाळ निष्ठेने सेवा बजावलेल्या कार्यकर्त्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी सहाय्यक दीपाली संजय गवळी या होत्या. संस्थेच्या सचिव कु. बाबई लक्ष्मण चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. या प्रसंगी सुजाता विठोबा मुकरे, सृबाई गोविंद बनसोडे आणि कांताबाई जगन्नाथ कांबळे या तीन सेवानिवृत्त अंगणवाडी सेविकांचा शाल, श्रीफळ, साडी-चोळी व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंजली नागेश चव्हाण, पुष्पा चव्हाण, वैजयंती गोवे, शिंदूबाई ढवळे, विशाखा गायकवाड, श्रीदेवी कर्पे, विजया कंदले, स्वाती कंदले, वैशाली जाधव, अंजली जाधव, संतोषी जाधव, सुषमा मातोळे, साधना बोर्डे, आशा बोर्डे व आशा गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.या सोहळ्यास स्थानिक महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# श्रीपतराव भोसले विद्यालयात बारावी निकालातील गुणवंतांचा गौरव सोहळा

आरंभ मराठी । धाराशिव

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र) परीक्षेचा निकाल दिनांक २ मे रोजी जाहीर झाला. या परीक्षेत श्रीपतराव भोसले उच्च माध्यमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत तिन्ही शाखांतील गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा गौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. विज्ञान शाखेत जाधव राज चंद्रजीत (९६.१७%) प्रथम, कु. भगत सिद्धी अरविंद (९५.००%) द्वितीय, तर निकम धैर्यशील कुमार (९४.६७%) तृतीय क्रमांकावर राहिले. तसेच गलांडे अमर विष्णू (९१.६७%), बनसोडे प्रथमेश सुरेश (९१.५०%), भराटे समृद्धी दीपक (९१.१७%), दहिफळे श्रेयश नामदेव (९०.५०%) आणि डंबळ अर्णव हर्षल (९०.००%) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले. कला शाखेत कु. चंदेले वैष्णवी रवींद्रसिंग (९२.३३%) प्रथम, कु. सय्यद सुमय्या अल्ताफ (८४.५०%) द्वितीय, तर पाटील देवदत्त सिताराम (८३.००%) तृतीय क्रमांकावर राहिले. वाणिज्य शाखेत कु. उंबरे श्रुती प्रदीप (८६.८३%) प्रथम, कु. खांडवे आरती बालाजी (८६.६७%) द्वितीय, तर शेख सोफीयान अजीजुद्दीन (८६.३३%) तृतीय आले.



संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत वाणिज्य शाखेतील कु. श्रुती प्रदीप उंबरे, सोफीयान अजीजुद्दीन शेख, कु. आरती बालाजी खांडवे, कु. प्रतिक्षा प्रकाश मस्के, कु. श्रुती सारंग राऊत तसेच विज्ञान शाखेतील कु. कन्हेरे समृद्धी सचिन, थोरात योगेश बाळासाहेब, कु. अत्तार सानिया सलीम, कु. रोटे वैभवी मेघराज, कु. स्वामी तृप्ती राजकुमार, कु. शेटे वैष्णवी कैलास आणि कु. ढेकणे हरिप्रिया सत्यवान यांनी राज्यात अव्वल स्थान पटकावले. याशिवाय आदित्य मोहन माळी याने संगणकशास्त्र विषयात २०० पैकी २०० गुण मिळवत राज्यात अव्वल स्थान मिळवले. गणित विषयात अमर विष्णू गलांडे व अभिषेक धनंजय देशमुख यांनी १०० पैकी १०० गुण मिळवत राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, सीईओ आदित्य पाटील, प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपप्राचार्य संतोष घार्गे, पर्यवेक्षक कैलास कोरके, मोहन शिंदे, कुमार निकम, 'फिजिक्सवाला' विभाग प्रमुख अरविंद भगत तसेच 'फेनॉमेनाल' बॅच प्रमुख शरद सदाफुले यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य संतोष घार्गे यांनी केले. अध्यक्ष सुधीर पाटील यांनी गुणवंतांचे अभिनंदन केले. सरचिटणीस प्रेमाताई सुधीर पाटील व प्रशासकीय अधिकारी साहेबराव देशमुख यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख दत्तात्रय जाधव यांनी केले. या समारंभास प्राध्यापक, विषयप्रमुख, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना ज्ञानप्रबोधिनी संस्थेचा दिलासा

## विहिरीतील गाळ काढण्याची मोहीम सुरू



आरंभ मराठी । परंडा

भूम, परांडा तालुक्यासह संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. विशेषतः चांदणी नदीपात्रालगतच्या शेतजमिनी खरडून गेल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले. शासनाने नुकसानभरपाई व विहिरीसाठी अनुदान जाहीर केले असले तरी प्रत्यक्षात ही मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसल्याची तक्रार आहे. हीच बाब लक्षात घेऊन हराळी येथील ज्ञानप्रबोधिनी संस्थेने पुढाकार घेत अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला आहे. ज्या शेतकऱ्यांच्या विहिरींमध्ये गाळ साचला आहे किंवा विहिरींची पडझड झाली आहे, अशा विहिरींची दुरुस्ती व गाळ काढण्यासाठी संस्थेने निधी उपलब्ध करून दिला आहे. ज्ञानप्रबोधिनी संस्था केंद्र हराळी यांच्या वतीने अंतरगाव, लाखी, ईडा आणि शिरसाव या गावांमध्ये विहिरीतील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले असून ही कामे केंद्रप्रमुख अभिजीत कापरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहेत. या उपक्रमामुळे जलस्त्रोत पुन्हा सक्षम करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले जात आहे. याचबरोबर संस्थेच्या माध्यमातून शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी १५ हजार लिटर क्षमतेची पिण्याच्या पाण्याची टाकी लोकवाटा व संस्थेच्या निधीतून उपलब्ध करून देण्यात आली आहे. पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य तसेच जीवनावश्यक वस्तूंचेही वाटप करण्यात आले होते. एकीकडे शासनाच्या मदतीची प्रतीक्षा करत असताना दुसरीकडे ज्ञानप्रबोधिनी संस्थेने प्रत्यक्ष काम करत शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचे काम सुरू केले आहे. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली आर्थिक टंचाई लक्षात घेऊन विहिरीतील गाळ काढून सिंचन व्यवस्था सक्षम करण्याचा प्रयत्न या माध्यमातून होत आहे.

### ज्ञानप्रबोधिनी संस्था मदतीला धावून आली

एकीकडे शासनाने फक्त घोषणा केल्या, पण प्रत्यक्षात मात्र ज्ञानप्रबोधिनी संस्था मदतीला धावून आली. त्यांच्या मदतीने विहिरीतील गाळ काढण्याचे काम सुरू असून यामुळे कायमस्वरूपी सिंचनाची सोय होणार आहे.

**अभिमान अर्जुन चोबे**
शेतकरी, सिरसाव.

### शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याचे प्रयत्न

ज्ञानप्रबोधिनी संस्था व लोकवाटा यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याचे काम सुरू आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर पडण्यासाठी मोठा हातभार लागणार आहे. अनेक भागांमध्ये विहिरीतील गाळ काढण्याची कामे वेगाने सुरू आहेत.

**सचिन सूर्यवंशी**
समन्वयक

# नरसापूर येथील घटनेचा भूम तालुका ब्राह्मण संघटनेच्या वतीने निषेध: आरोपीस फाशीची मागणी

आरंभ मराठी । भूम

पुणे जिल्ह्यातील नरसापूर येथे महाराष्ट्र दिनी (दि.१) एका अल्पवयीन निष्पाप मुलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याच्या संतापजनक घटनेच्या निषेधार्थ भूम तालुका ब्राह्मण संघटनेच्या वतीने सोमवारी (दि.४) सकाळी उपविभागीय अधिकाऱ्यांची भेट घेऊन निषेधाचे निवेदन सादर करण्यात आले. या अमानुष घटनेतील आरोपीस तात्काळ कठोरात कठोर शिक्षा देऊन फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सकाळी ११ वाजता ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत तालुक्यातील सकल ब्राह्मण समाजाचे युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने एकत्र जमले होते. उपस्थितांनी या दुर्दैवी घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शासनाने कठोर आणि प्रभावी पावले उचलावीत, अशी मागणी केली. या प्रसंगी ह.भ.प. अरुण शाळू महाराज, जिल्हा संघटना पदाधिकारी विलास शाळू, ए. पी. देशपांडे, संघटना अध्यक्ष सुधीर देशमुख, लक्ष्मीकांत देशमुख, भगवंत देशमुख, आनंद बेलसरे, मनोज क्षीरसागर, गोटू तेरकर, मनीष राजोपाध्ये, श्रीपाद देशमुख, किरण कुलकर्णी, विजयकुमार देवडीकर, उमाकांत वासकर, उदय कुलकर्णी, हेमंत देशमुख, सचिन बारगजे, गोपाळ व्यवहारे, सुमंत देशमुख, सुरेश वैद्य, विधिज्ञ संजय शाळू, मयूर शाळू, नारायण आरगडे, तुषार कुलकर्णी यांच्यासह सकल ब्राह्मण समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक आरंभ मराठी

## डिझेल मिळत नसल्याने उद्योगांसह शेतीकामावर परिणाम

# जिल्ह्यात कृत्रिम इंधन टंचाईचा संशय; पेट्रोल पंपावर लांबच लांब रांगा

आरंभ मराठी । धाराशिव

अमेरिका–इस्त्राईल–इराण युद्धविरामाला महिना उलटूनही इंधन पुरवठ्याबाबतची परिस्थिती सुधारलेली दिसत नाही. गॅससाठी लागणाऱ्या रांगा अद्याप कायम असून आता डिझेल विक्रीवरही मर्यादा आणल्याने नागरिकांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. पुरवठा विभागाकडून इंधन सुरळीत असल्याचा दावा केला जात असतानाही प्रत्यक्षात मात्र धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी टंचाईची स्थिती जाणवत आहे. धाराशिव शहरातील काही पेट्रोल पंप मागील दोन दिवसांपासून पूर्णपणे बंद असल्याचे चित्र आहे. तर काही ठिकाणी पेट्रोल उपलब्ध असले तरी डिझेल नसल्याचे सांगण्यात येत आहे. विशेषतः राष्ट्रीय महामार्गावरील पंपांवर वाहनधारकांना केवळ १ हजार ते २ हजार रुपयांपर्यंतच डिझेल देण्याची मर्यादा घालण्यात आली आहे. त्यामुळे मालवाहतूक वाहनचालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, सीएनजीसाठीही मोठ्या रांगा लागत असल्याने वाहनचालकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. रविवारपासून जिल्ह्यात सर्वत्र इंधन टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येत असून पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. पुरवठा विभागाने मात्र इंधन टंचाईचा दावा फेटाळला असून जिल्ह्यात पुरवठा नियमित असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष परिस्थिती आणि प्रशासनाच्या दाव्यात मोठी तफावत दिसून येत आहे. अनेक नागरिक आणि वाहनचालकांच्या मते, कोणतेही ठोस कारण नसताना कृत्रिम टंचाई निर्माण करून काही विक्रेते आर्थिक फायदा करून घेत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.या परिस्थितीचा उद्योग, व्यवसाय तसेच शेतीकामावर मोठा परिणाम होत आहे. विशेषतः शेतीसाठी आवश्यक असलेले डिझेल मर्यादित मिळत असल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाने तातडीने परिस्थितीची दखल घेऊन वास्तव स्थिती स्पष्ट करावी आणि कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



### इंधन दरवाढ होण्याच्या भीतीने दरवाढ

पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि केरळम येथील निवडणुका पार पडताच इंधन दरवाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पेट्रोल पंप चालकांकडून कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असल्याचे सांगितले जात आहे. पुरवठा विभागाकडून पेट्रोल पंपावर जाऊन पाहणी करून सत्य परिस्थितीची खात्री करावी अशी मागणी वाहन चालक करत आहेत.

### नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये

धाराशिव जिल्ह्यात अफवांवर विश्वास ठेवल्यामुळे नागरिकांकडून जास्तीचे इंधन भरण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे अचानक मागणी वाढली असून, इंधन टंचाई जाणवू लागली आहे. त्यातच इंधन दरवाढ होण्याच्या भीतीने देखील नागरिक जास्त इंधन भरत आहेत. नागरिकांनी पंपावर गर्दी टाळावी, इंधनाचा साठा करू नये आणि अफवांवर विश्वास ठेवू नये.

**स्वाती शेंडे**
जिल्हा पुरवठा अधिकारी, धाराशिव.

# उमरगा तहसील कार्यालयाचा दिव्यांगांसाठी पुढाकार

## आज आधार-UDID विशेष शिबिर

आरंभ मराठी । नारंगवाडी

तहसील कार्यालय उमरगा यांच्या वतीने दिव्यांग नागरिकांच्या सोयीसाठी आज (दि.५) विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात तहसील प्रशासनाने जाहीर आवाहन प्रसिद्ध करून संबंधित लाभार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजना तसेच श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजनेतील अनेक लाभार्थ्यांना आधार अपडेट करताना अडचणी येत आहेत. हाताचे ठसे व डोळ्यांचे स्कॅन व्यवस्थित न झाल्यामुळे बायोमेट्रिक पडताळणी पूर्ण होत नसल्याने अनुदान मिळण्यात अडथळे निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या विशेष शिबिरात आधार अपडेट, बायोमेट्रिक व्हेरिफिकेशन तसेच UDID (Unique Disability ID) प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तहसीलदार गोविंद येरमे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, शिबिरास उपस्थित राहताना आधार कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र आणि आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक अशी आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले आहे.

# परंडा तालुक्यात पूरबाधित शाळांना सीमेन्स युनियनचा दिलासा; सहा जि.प. शाळांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

## कामगारांच्या वर्गणीतून उभारलेला निधी समाजकार्यासाठी

आरंभ मराठी । परंडा

**परंडा तालुक्यातील अतिवृष्टी व पूरग्रस्त भागातील शाळांना मदतीचा हात देत सीमेन्स वर्कर्स युनियन व सीमेन्स ऐक्य एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट, ठाणे (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने सहा जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना लाखो रुपयांचे शैक्षणिक साहित्य व आवश्यक उपकरणांचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.**




आवार पिंपरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या आवारात झालेल्या कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरणात साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत आवार पिंपरी, वागेगव्हाण, कपिलापुरी, देवगाव (खुर्द), देऊळगाव व कारंजा येथील शाळांना त्यांच्या गरजेनुसार विविध सुविधा पुरविण्यात आल्या. यामध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालये, पाईपलाईन, पाण्याच्या टाक्या व स्टँड, शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर फिल्टर, स्टील टाक्या, इलेक्ट्रिकल इनव्हर्टर, सतरंज्या, सीलिंग फॅन्स, २० लिटर क्षमतेचे थर्मास फ्लास्क तसेच प्रयोगशाळेसाठी लागणारे साहित्य देण्यात आले. कार्यक्रमास सीमेन्स ऐक्य एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्टचे अध्यक्ष अशोक राणे, विश्वस्त तथा सीमेन्स क्रेडिट सोसायटीचे सचिव मनोज मोहिते, सीमेन्स वर्कर्स युनियनचे छत्रपती संभाजीनगर शाखा सचिव दत्तू भंडे, माजी कौन्सिल मेंबर प्रकाश जाधव, सीमेन्स हौसिंग सोसायटीचे माजी अध्यक्ष विजय जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय पंचायत समितीच्या सभापती अर्चना जाधव, शिवसेना तालुकाप्रमुख आण्णासाहेब जाधव, शालेय समिती अध्यक्ष राजकुमार नरुटे, उपाध्यक्ष धनश्री गुडे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना अशोक राणे व दत्तू भंडे यांनी सांगितले की, सीमेन्स वर्कर्स युनियन व ऐक्य ट्रस्टच्या माध्यमातून कामगारांच्या मासिक वर्गणीतून निधी जमा करून देशभरात, विशेषतः ग्रामीण भागात विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. शिक्षण, पाणी व मूलभूत सुविधा या क्षेत्रांत सातत्याने मदत करण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मदत मिळालेल्या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांनी संस्थेचे आभार मानले. शहाजी घावटे (आवार पिंपरी), शिवाजी शिंदे (वागेगव्हाण), शिवाजी पंडित (कपिलापुरी), बाबासाहेब शिंदे (देवगाव खुर्द), सचिन सूर्यवंशी (देऊळगाव) आणि आण्णा कोळी (कारंजा) यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत या साहित्यामुळे नक्कीच वाढ होईल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी सर्व मुख्याध्यापकांनी सीमेन्स वर्कर्स युनियन व ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांचा आभारपत्र देऊन सन्मान केला. उपस्थित मान्यवरांनी युनियनचे जनरल सेक्रेटरी गिरीष आष्टेकर, अध्यक्ष मनोज बोडके व सर्व पदाधिकाऱ्यांचे या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल अभिनंदन केले.

## जागतिक योगासन स्पर्धेत हिंदवी चौरे आणि सतीश साबळे करणार देशाचे प्रतिनिधित्व

आरंभ मराठी । धाराशिव

योगासन भारत च्या वतीने वतीने घेण्यात जागतिक योगासन अजिंक्यपद स्पर्धा निवडचाचणी तुन धाराशिव जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनचे योगपटू हिंदवी चौरे आणि सतीश साबळे यांची जागतिक योगासन अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. सोनिपत हरियाणा येथील भारतीय क्रीडा प्राधिकरण केंद्रात या निवडचाचणी घेण्यात आली होती. सब जुनियर, जुनियर व सिनियर वयोगटातील विविध प्रकारातील राष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ठ ३ योगपटू निवडचाचणीत सहभागी करण्यात आले होते. महाराष्ट्र संघाकडून सहभागी धाराशिव जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनचे सब जुनियर मुलींच्या वयोगटात फॉरवर्ड बेंडिंग प्रकारात हिंदवी चौरे हिची तर सिनियर पुरुष वयोगटात ट्विस्टिंग बॉडी प्रकारात सतीश साबळे यांची भारतीय संघात निवड झाली आहे.



१० मे ते २ जून दरम्यान अहमदाबाद ( गुजरात ) येथे वर्ल्ड योगासन च्या अधिपत्याखाली योगासन भारत च्या वतीने या स्पर्धा होणार आहेत. हिंदवी आणि सतीश यांची भारतीय संघात निवड झाल्याबद्दल धाराशीव जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन चे अध्यक्ष अतुल अजमेरा, उपाध्यक्ष गौरव बागल, डॉ स्वाती लाकाळ, सचिव स्वाती गडदे, सहसचिव राजेश बिलकुले, योगेश थोरबोले, कोषाध्यक्ष अभय वाघोलीकर, संचालक प्रणाली जगदाळे, सीमा चौरे, अश्विनी जाधव, इंदुमती जाधव, रामेश्वर सावंत आदिसह जिल्ह्यातील योगप्रेमी यांनी अभिनंदन केले आहे.

## धाराशिवमध्ये वाहतूक नियमभंगाविरोधात मोठी मोहीम; ३२६ कारवाया, २.८९ लाखांचा दंड वसूल

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरातील वाहतूक शिस्त राखण्यासाठी वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी ३ मे रोजी मोठ्या प्रमाणात कारवाई केली. मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर एकूण ३२६ कारवाया करत २ लाख ८९ हजार रुपयांचे 'तडजोड शुल्क' वसूल करण्यात आले. आठवडी बाजाराचा दिवस असल्याने शहरात मोठी गर्दी झाली होती. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली. छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजमाता जिजाऊ चौक, महात्मा बसवेश्वर चौक, आठवडी बाजार परिसर तसेच देशपांडे स्टँड या महत्त्वाच्या ठिकाणी तपासणी नाकेबंदी करून ही कारवाई करण्यात आली.वाहतूक नियमांचे पालन करून अपघात टाळावेत, तसेच शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## नसरापूर अत्याचार प्रकरणाचा परंड्यात तीव्र निषेध

आरंभ मराठी । परंडा

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे चार वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अत्याचार व निर्घृण हत्येच्या घटनेचा परंडा तालुक्यात तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या अमानुष घटनेविरोधात सकल समाज बांधव व विविध सामाजिक-राजकीय क्षेत्रातील नागरिकांनी एकत्र येत तहसीलदारांना निवेदन दिले. निवेदनात आरोपीविरुद्ध फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवून त्याला तातडीने फाशीची शिक्षा द्यावी, तसेच पीडित कुटुंबाला आर्थिक मदत व संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी विविध मान्यवरांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.

## पीक विमा भरपाईसाठी अनिल जगताप यांचे आज धरणे आंदोलन

### शेतकऱ्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

आरंभ मराठी । धाराशिव

खरीप 2020 व 2025 च्या पिक विमा नुकसान भरपाईसाठी धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह मंगळवारी (दि.5) सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी नेते अनिल जगताप यांनी दिली. धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उच्च व सर्वोच्च न्यायालयाने खरीप 2020 संदर्भातील पीक विमा नुकसान भरपाई पोटी प्रति हेक्टर 18 हजार रुपयांप्रमाणे एकूण 639 कोटी रुपये देण्याचे आदेश दिले होते. त्यापैकी 376 कोटी रुपयांचे वाटप झाले असले तरी उर्वरित रक्कम अद्यापही शेतकऱ्यांना मिळालेली नाही. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने 94 कोटी रुपयांवर स्थगिती दिली असली तरी 134 कोटी रुपयांवर कोणतीही स्थगिती नसतानाही संबंधित रक्कम वितरित करण्यात आलेली नाही. याबाबत 11 फेब्रुवारी रोजी शासन निर्णयही निघाला आहे, मात्र



अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना एक रुपयाही मिळालेला नाही. खरीप 2025 मध्ये राज्य शासनाने नवीन पिक विमा योजना लागू केली असून पेरणीपासून कापणीपर्यंत पीक कापणी प्रयोगांच्या आधारेच नुकसान भरपाई देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यापूर्वी नुकसान भरपाईसाठी असलेले चार ट्रिगर बंद करण्यात आल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. धाराशिव जिल्ह्यात एकूण 504 पीक कापणी प्रयोग पार पडले असून त्यापैकी 217 प्रयोगांवर विमा कंपनीने आक्षेप घेतले होते. जिल्हास्तरीय सुकाणू समितीने त्यातील 200 आक्षेप फेटाळले असून उर्वरित 17 प्रकरणे राज्यस्तरीय समितीकडे पाठविण्यात आली आहेत. त्या संदर्भात सुनावणीही पूर्ण झाली असली तरी शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप कोणतीही रक्कम जमा झालेली नाही. दरम्यान, महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये चालू वर्षातील पीक विमा भरपाईचे वितरण सुरू झाले आहे. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यासाठी 813 कोटी रुपयांची मंजुरी देण्यात येऊन त्याचे वितरणही सुरू झाले आहे. मात्र धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी अद्यापही प्रतीक्षेत असून त्यांच्या अडचणी वाढत आहेत. पिक विमा कंपनी, शासन व प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या हक्काची नुकसान भरपाई तात्काळ मिळावी, यासाठी हे धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अनिल जगताप यांनी केले आहे.

## 24 तासांत दरोडेखोर जेरबंद करणाऱ्या पोलिसांचा माजी सैनिक संघटनेकडून गौरव



आरंभ मराठी । परंडा

परंडा तालुक्यातील कुंभेजा येथे माजी सैनिक विश्वनाथ जगताप यांच्या घरावर झालेल्या हल्ला व दरोड्याच्या गंभीर घटनेचा स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) पोलिसांनी अवघ्या २४ तासांत छडा लावून आरोपींना अटक केली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल धाराशिवचे पोलीस अधीक्षक रितू खोकर तसेच पोलीस निरीक्षक विनोदी पवार यांचा परंडा तालुका माजी सैनिक संघटनेच्या वतीने सोमवारी (दि. ४) सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पोलिसांनी दाखवलेल्या कार्यतत्परतेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कमी वेळेत गुन्ह्याचा उलगडा करून आरोपींना अटक केल्याबद्दल उपस्थितांनी पोलिसांचे विशेष अभिनंदन केले. कार्यक्रमास माजी सैनिक संघटनेचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब मांडवे, उपाध्यक्ष विकास चौधरी यांच्यासह भराटे, शेळके, भोसले, महावीर तनपुरे, बारसकर, देवकर, बिडवे, सूर्यवंशी, यादव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी भविष्यातही अशाच तत्परतेने नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासन कार्यरत राहील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## पोटनिवडणुकीतील विजय व विविध राज्यांतील यशामुळे भाजप कार्यकर्त्यांत नवचैतन्य - दत्ताभाऊ कुलकर्णी

आरंभ मराठी । धाराशिव

देशातील विविध राज्यांतील विधानसभा निवडणुकींचे निकाल तसेच महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पोटनिवडणुकांमध्ये मिळालेल्या यशाबद्दल भारतीय जनता पक्षाच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात आला. यासंदर्भात धाराशिव भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे पश्चिम बंगाल, पुदुच्चेरी आणि आसाम या राज्यांमध्ये भाजपला मिळालेले यश हे विकासाभिमुख धोरणांवर जनतेने दाखवलेल्या विश्वासाचे द्योतक असल्याचे सांगितले. सुशासन, पायाभूत सुविधा विकास, महिला सक्षमीकरण, युवकांसाठी रोजगाराच्या संधी तसेच शेतकरी हिताच्या विविध योजनांना मतदारांनी दिलेला पाठिंबा या निकालांतून स्पष्ट होत असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी विजय मिळवला, तर बारामती विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या नेत्या तथा उपमुख्यमंत्री



सुनेत्रा पवार यांनी तब्बल २ लाख १८ हजार ९३० मतांच्या विक्रमी फरकाने विजय संपादन केला. हा निकाल लोकशाही प्रक्रियेत जनतेच्या सक्रिय सहभागाचे उदाहरण असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले. देशातील विविध राज्यांतील निकाल आणि महाराष्ट्रातील पोटनिवडणुकीतील यशामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून धाराशिव जिल्ह्यात संघटनात्मक काम अधिक वेगाने राबविण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच स्थानिक पातळीवरील जनतेच्या प्रश्नांवर अधिक लक्ष केंद्रित करून पक्ष संघटना बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हा प्रभारी डॉ. अर्चनाताई चाकूरकर, शरण पाटील, अनिल काळे, नेताजी पाटील, सतीश दंडनाईक, विक्रमसिंह देशमुख, नितीन भोसले, प्रदीप शिंदे, साहेबराव घुगे, गणेश खरसडे, अस्मिता कांबळे, दिलीप भालेराव, प्रकाश आष्टे, संतोष बोबडे, प्रीती कदम, डॉ. सरोजिनी राऊत, विजय शिंगाडे, सिद्धेश्वर कोरे यांच्यासह सर्व मंडल अध्यक्ष, मोर्चा अध्यक्ष, आघाडी व प्रकोष्ठ संयोजक, जिल्हा व मंडल पदाधिकारी, नगरसेवक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत हगलगुंडे यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर

आरंभ मराठी । अणदूर

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत हगलगुंडे यांना आधार फाउंडेशन व एस.आर. 24 न्यूज मीडिया समूह, राहुरी (अहिल्यानगर) यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. गेल्या 35 वर्षांपासून पत्रकारितेत कार्यरत असलेल्या हगलगुंडे यांनी सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली आहे. यापूर्वीही त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. या निवडीचे पत्र फाउंडेशनचे सचिव सोमनाथ वाघ व कार्याध्यक्ष रमेश खेमनर यांनी दिले असून, त्यांच्या या यशाबद्दल जयमल्हार पत्रकार संघ तसेच विविध संस्थांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

दैनिक आरंभ मराठी

### कागदपत्रे दडपल्याचा संशय, जनशक्ती आघाडीचा आंदोलनाचा इशारा

## भूम नगरपरिषदेत घनकचरा व्यवस्थापनात भ्रष्टाचाराचा आरोप

### चौकशीसाठी नगरसेवक आक्रमक

आरंभ मराठी । भूम

भूम नगरपरिषदेच्या प्रशासकीय कार्यकाळात गेल्या चार वर्षांपासून घनकचरा व्यवस्थापन विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप जनशक्ती नगर विकास आघाडीच्या नगरसेवकांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली असून, याविरोधात एकत्रितपणे लढा उभारण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला आहे. नगरपरिषदेमध्ये एकूण २० नगरसेवक, नगराध्यक्षा तसेच २ स्वीकृत नगरसेवक असे मिळून २३ सदस्य आहेत. प्रशासकीय कार्यकाळात झालेल्या कथित गैरव्यवहाराविरोधात सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे मत आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. घनकचरा व्यवस्थापन विभागात प्रत्यक्ष कामावर येणाऱ्या मजुरांची संख्या अत्यल्प असताना, अधिकृत नोंदींमध्ये मात्र मजुरांची संख्या जास्त दाखवण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे नगरपरिषदेच्या निधीचा अपव्यय झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. याशिवाय प्रत्यक्ष काम करणाऱ्या मजुरांना कमी मानधन दिले जात असल्याचा आरोपही करण्यात आला असून, मजुरांचे आर्थिक शोषण होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. आघाडीचे बांधकाम सभापती अनिल शेंडगे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करताना सांगितले




की, गेल्या चार वर्षांत मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता झाल्याचा संशय आहे. आम्ही संबंधित कागदपत्रांची वारंवार मागणी केली, मात्र अधिकाऱ्यांकडून ती उपलब्ध करून दिली जात नाहीत. कागदपत्रे देण्यास टाळाटाळ होत असल्याने संशय अधिकच बळावत आहे. नगरसेवकांनी प्रशासनावर पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप करत घनकचरा विभागातील मागील चार वर्षांतील उपस्थिती नोंदी, वेतन वितरण, ठेकेदारी कागदपत्रे आणि आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे शहराच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, नगरपरिषद प्रशासनाची पुढील भूमिका काय असेल याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, जनशक्ती नगर विकास आघाडीने या विषयावर लवकरच व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. शहरातील नागरिकांनीही या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणावे, तसेच नगरपरिषदेच्या कारभारात पारदर्शकता राखून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

## लिंबोणीबागेत बुद्धपौर्णिमा साजरी



आरंभ मराठी । धाराशिव

लिंबोणीबाग तांबरी विभागात बुद्धपौर्णिमा साजरी करण्यात आली. परिसरातील नागरिकांनी एकत्र येत भगवान बुद्धांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे अध्यक्ष धनंजय शिंगाडे,जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रवीण आबा सूर्यवंशी, अभिजीत सूर्यवंशी, डॉ. विजय शिंदे, रोहिदास झेंडे, राजश्री कदम, शीला चंदनशिवे यांच्यासह भीमाई मंडळाच्या अध्यक्षा विजयमाला धावारे, जयंती मंडळाच्या अध्यक्षा राजश्री धावारे, राजेंद्र धावारे, फेरोज पल्ला, गजानन पाटील तसेच बौद्धाचार्य गुणवंत सोनवणे उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी बुद्धांच्या विचारांचे स्मरण करत सामाजिक सलोखा आणि समतेचा संदेश दिला.

दैनिक आरंभ मराठी